# जाहीर नोटीस

## प्रमुख जिल्हा न्यायालय, रत्नागिरी या न्यायालयात

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की,......

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी अधिपत्याखालील दिवाणी न्यायालय व.स्तर, रत्नागिरी येथील कॅनॉन २२०२ एन ही झेरॉक्स मशीन बायबॅक पद्धतीने देवून नव्याने ubuntu व windows ऑपरेटिंग सिस्टीमला सपोर्ट करणारी तसेच खालील नमुद तक्त्याप्रमाणे तंत्रज्ञान असणारी **एक झेरॉक्स मशीन** बायबॅक पद्धतीने खरेदी करणेची आहे.

| | |
|---|---|
| **Functions** | Standard: Print, Copy, Scan |
| **Print Speed** | Up to 35 ppm (A4), 19 ppm (A3) |
| **Print Resolution** | 1200 x 600 dpi, 600 x 600 dpi |
| **Duplex Printing** | Standard/ Booklet printing |
| **Memory / Storage** | 4 GB RAM, 128 GB SSD |
| **Connectivity** | USB 2.0, Ethernet, and Wireless LAN (Wi-Fi) |
| **Display** | 7.0-inch color LCD touchscreen |
| **Support System** | Ubuntu & Windows |
| **Tray** | Paper Tray 2x 500 & 100 Bypass tray |

तरी ज्या कोणा संस्थेला/पुरवठादारास/व्यक्तीला वर नमुद केलेप्रमाणे एक झेरॉक्स मशीन कॅनॉन झेरॉक्स मशीन २२०२ एन बायबॅक पद्धतीने देवून नव्याने ubuntu व windows ऑपरेटिंग सिस्टीमला सपोर्ट करणारी तसेच वर नमुद तंत्रज्ञानाप्रमाणे अदयावत असणारी, एक झेरॉक्स मशीन योग्य दरात पुरविणे शक्य असेल, त्यांनी दरपत्रके (निविदा) खालील अटी व शर्तीस अधीन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर व वेबसाईटवर प्रसिध्द केलेपासून बारा दिवसांचे आत म्हणजेच दिनांक ०२/०६/२०२६ पर्यंत सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून द्यावीत.

### दरपत्रकांबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपुर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे. त्यामध्ये कर, वस्तुची किंमत इत्यादी बाबी स्वतंत्र नमुद कराव्यात. तसेच दरपत्रकामध्ये विना लेटरहेडवर SGST/CGST क्रमांक नमुद करावा व पॅनकार्डची झेरॉक्सप्रत दरपत्रकासोबत सादर करावी.

२. सदर लखोटयावर मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी येथे झेरॉक्स मशीन खरेदीबाबतचे दरपत्रक असे नमुद असावे.

३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखे नंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही.

४. सर्वात कमीतकमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांचे दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये. तसेच झेरॉक्स मशीन दिवाणी न्यायालय व.स्तर, रत्नागिरी येथे प्रत्यक्ष जागेवर येवून बसवायचे आहे. त्याचा वाहतुकीचा वेगळा खर्च आकारता येणार नाही किंवा मागणी करता येणार नाही.

५. पुरविणेत येणारे झेरॉक्स मशीन हे चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहे. सदरचे पुरविणेत आलेले झेरॉक्स मशीन खराब निघाल्यास ते पुन्हा नव्याने पुरविणे बंधनकारक राहील.

६. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक व वस्तुचा दर्जा चांगला असेल तसेच जाहीर निविदेमध्ये नमुद केलेल्या तंत्रज्ञानाप्रमाणे जे दरपत्रक असेल त्या दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

७. महाराष्ट्र राज्य शासनाने जाहीर केलेल्या ब्लॅक लिस्टमधील पुरवठादारांनी निविदा भरु नये. अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.

८. सदरची जाहिरात मा. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी या न्यायालयाच्या https://ratnagiri.dcourts.gov.in या संकेतस्थळावरती प्रसिध्द करणेत आलेली

९. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रके नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांना राहील.

आज दि. २२/०५/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

दिनांक— २२/०५/२०२६

DISTRICT COURT OF RATNAGIRI
सत्यमेव जयते
डिस्ट्रिक्ट कोर्ट, रत्नागिरी

**प्रभारी प्रबंधक,**
**जिल्हा न्यायालय, रत्नागिरी**
म.जा.क्र. वित्त/3037/२०२६
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दिनांक— २२/०५/२०२६

**<u>प्रत नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी—</u>**

१. सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
२. जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी.
३. मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, रत्नागिरी.
४. मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.
५. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
६. मा. तहसिलदार कार्यालय, रत्नागिरी.
७. नगरपरिषद, रत्नागिरी.